# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२२०६५५/२२/अ.क्र.४१८८/२५/०१**

**श्री. विनोद मोहनलाल जैन**
**श्री. उदय सहदेव नागवेकर**
३/३८, मंत्री कॉर्नर, सायानी रोड व गोखले रोड जंक्शन,
प्रभादेवी, मुंबई-४०००२५

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/उत्तर**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
तळमजला, हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/उत्तर**
बृहन्मुंबई महानगरपालिका, जी/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
तळमजला, हरिश्चंद्र येवले मार्ग, दादर (प), मुंबई ४०० ०२८

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०७.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.२४.०७.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनूपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/उत्तर विभाग, श्री. विनोद केशव पाटील व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त जी/उत्तर विभाग यांचे प्रतिनिधी वरीष्ठ सुविधाकार, श्री. संतोषकुमार जैस्वाल उपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. विनोद मोहनलाल जैन, श्री. उदय सहदेव नागवेकर यांनी दि.१५.१२.२०२० रोजी वसाहत अधिकारी जी उत्तर यांना यांच्याकडे सादर केलेला प्रशासकीय अधिकारी जी उत्तर यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ६(३) द्वारे अग्रेषित केलेला जोडपत्र-अ यात दि.०२.०१.२०२१ रोजी प्राप्त झालेला अर्ज यात अपिलार्थी यांनी "श्री जय हनुमान नगर सहकारी गृहनिर्माण संस्था अंतिम न. भूमापन क्र.५५४ टी.पी.एस.-४ या संस्थेचे परिशिष्ट-२ तयार करण्यात आले त्या कालावधीत जे जे अधिकारी कार्यरत होते, त्या सर्व अधिकाऱ्यांची नावे त्यांचे पदनाम दैनंदिनी हजेरीपट त्यातील प्रत्येक पृष्ठ माहिती

अधिकार अधिनियम, २००५ च्या शिक्क्यासह जन माहिती अधिकारी यांच्या सहीनीशी साक्षांकित करून हवे" असल्यास नमूद केलेले आहे. माहितीचा कालावधी हा सन १९९५ ते अर्ज दाखल करण्याचे दिनांक (दि.१५.१२.२०२०) म्हणजे जवळजवळ २५ वर्ष असल्याचे आढळून येते. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.११.०१.२०२१ रोजी सदर मागितलेले माहितीच्या अनुषंगाने सन १९९५ पासून ते दि.१४.०७.२०१७ दि.१५.०७.२०१७ ते दि.१५.०३.२०२० पर्यंत बायोमेट्रिक हजेरी त्या आधीच्या कालावधीतील हजेरी पुस्तक तसेच दि.१६.०३.२०२० पासून ते आजतागायत अपेक्षित असलेल्या अधिकाऱ्यांचे नाव व पदनामासहित असलेल्या दैनंदिन हजेरी नोंदवहीची माहिती ही कार्यालयाच्या अभिलेखावर उपलब्ध असून सदर माहिती निरीक्षणाकरिता तयार आहे. तरी निरीक्षणाकरिता कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत जन माहिती अधिकारी यांना पूर्व सूचना देऊन हजर राहावे व विहित प्रक्रियेनुसार व विहित शुल्क प्रदान करून हवी असलेली माहिती नागरी सेवा केंद्रात शुल्क भरणा केल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येईल, असे नमूद केले. त्याविरुद्ध अपिलार्थी यांनी दि.२९.०१.२०२१ रोजी सहाय्यक आयुक्त जी उत्तर विभाग येथे प्रथम अपील अर्ज दाखल केला असून, विहित मुदतीमध्ये माहिती प्रदान केली नसल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ७(६) नुसार अपिलार्थी यांनी मोफत माहिती पुरवण्याची विनंती केली असून, शास्ती व शिस्तभंगाची कारवाई कलम १९(८)(ख) अन्वये रुपये १०,०००/- इतकी नुकसान भरपाई देखील मागितलेली आहे. वरील अपील अर्जाच्या सुनावणीत दि.१९.०९.२०२१ रोजी आयोजित करण्यात आली होती. मात्र यात प्रत्यक्षात सुनावणी झाली किंवा कसे याबाबतीत कागदपत्रावर कुठलीच नोंद नाही. अपिलार्थी यांनी दि.०६.०४.२०२१ रोजी अपील अर्जावर सुनावणी घेतली नसल्याचा आक्षेप नोंदवीत प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे.

अपिलार्थी यांनी दाखल केलेला जोडपत्र-अ हा कोविड-१९ च्या पहिला लाटे दरम्यान दाखल केलेला असून, वरील कालावधीत झालेले सर्वच प्रकारचे विलंब महाराष्ट्र शासनाने **Epidemic Diseases Act** खाली जारी केलेले दिशानिर्देश तसेच मा. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी **Sue Moto W.P. (Civil) No.३/२०२०** मध्ये दिनांक ०८ मार्च २०२१ च्या न्याय निर्णयान्वये या कायद्यातील विहीत कालमर्यादेतून दि.१५.०३.२०२० ते दि.१४.०३.२०२१ हा कालावधी वगळण्याचे आदेश केले आहेत. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले दिशानिर्देश तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्ण पिठाने कोरोना कालावधीत झालेल्या विलंब क्षमा करण्याबाबत जारी केलेले दिशानिर्देश इत्यादी अवलोकन केले असता, सदर प्रकरणी दाखल केलेला माहिती अर्ज व प्रथम अपिल अर्ज ज्या कालावधीत केलेला आहे संबंधित कालावधी हा कोविड-१९ चा प्रादुर्भावाचा कालावधी असल्यामुळे प्राधिकरणाच्या वतीने सादर केलेला मान्य करण्याजोगा आहे.

तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या आधीच कोविड कालावधीत सर्व प्रकारचे विलंब क्षमापिल केली असून त्या कालावधीत वैद्यकीय आणीबाणीची परिस्थिती शासनाने Disaster Management Act, वैद्यकीय कायदा अंतर्गत जारी केलेल्या लॉकडाऊनचे निर्देश तथा कार्यालयातील उपस्थितांवर प्रतिबंध, कार्यालयीन कर्मचाऱ्यांना झालेली कोरोनाची लागण इत्यादी बाबी लक्षात घेता, या प्रकरणात झालेला विलंब क्षमापित करण्यात येत असून कार्यालयांनी कलम २ (च) याप्रमाण उपलब्ध असलेली माहिती सॉफ्ट कॉपी स्वरूपात अपिलार्थी यांना विनामूल्य प्रदान करावी. तसेच, आयोगाच्या दि.२९.०४.२०२५ रोजी जारी केलेल्या कलम १९(८), २५(५) प्रमाणे जारी केलेल्या निर्देशाप्रमाणे अपिलार्थीस प्रदान केलेली माहिती महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर देखील विनामूल्य प्रदान करावी.

महाराष्ट्र शासनाने **Epidemic Diseases Act** खाली जारी केलेले दिशानिर्देश Disaster Management Act, वैद्यकीय कायदा अंतर्गत जारी केलेल्या लॉकडाऊनचे निर्देश तथा कार्यालयातील उपस्थितांवर प्रतिबंध या अंतर्गत केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी निर्गमित केलेल्या आदेशानुसार लॉकडाऊन शासकीय कार्यालयातील उपस्थितीवर निर्बंध तसेच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव इत्यादींमुळे उद्भवलेली वैद्यकीय आणीबाणीची परिस्थिती लक्षात घेता मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय यांचे पूर्णपीठ यांनी सदर कालावधीत झालेले सर्वच विलंब हे क्षमापित केले असून, अपिलार्थी यांनी याबाबतीतील उपस्थितीत केलेला आक्षेप हा कायदेशीर वस्तूस्थितीवर आधारीत नाही, असे प्रथम दर्शनी आढळून येते. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/उत्तर विभाग यांनी यासंदर्भात या आधीच सकारात्मक प्रतिसाद दिला असून, कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती अवलोकन करून प्राप्त करून घेण्याबाबत सुचित केलेले आहे. माहितीचा कालावधीचा व्याप्ती हा तब्बल २५ वर्षांचा असल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी जी/उत्तर विभाग यांनी दिलेला प्रतिसाद हा सुयोग्य असून, अपिलार्थी यांनी त्यानंतर या संदर्भात कुठलाच पाठपुरावा केलेला नाही. माहितीचे अवलोकन देखील घेतलेले नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेता व अपिलार्थी आज कुठलीही पूर्वसूचना न देता गैरहजर असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षास आयोग येत असून प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

( राहुल भा. पांडे )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २४.०७.२०२५**

२४.०७.२०२५